# « SUR LES PAS DE L'INDE » - « THE STEP TO INDIA »

INDIAN PRESS MAHARASHTRA (NASIK)

## फ्रेंच कलाकारांच्या भरतनाट्यम्ने रसिक दंग



शिवालय नृत्यकलामंदिर आणि भारत-फ्रान्स सांस्कृतिक मंडळ यांच्या सहकार्याने आयोजित भारत-फ्रान्स नृत्योत्सवात फ्रान्सच्या मार्सेल परिसरातील कलाकार पॅट्रीक व निर्मला ग्लेझ यांच्या भरतनाट्यम सादरीकरण व नाट्याभिनयाने रसिक दंग झाले.

यंदा भारत फ्रान्स नृत्यमहोत्सवाचे १२ वे पुष्प भारतीय शास्त्रीय नृत्याने गुंफले गेले. यावेळी भरतनाट्यम मधील अवघड अंग-प्रत्यंगाच्या हालचाली तालबध्दरितीने मांडल्या. कार्यक्रमाच्या सुरूवातीला कालीमातेची स्तुती सादर करत 'अलारिप' हा प्रकार सादर केला. पॅट्रीक यांनी रुद्रशिवावतार व शिवलिंग प्रार्थना नृत्याद्वारे सादर केली. निर्मला ग्लेझ यांनी तामीळ भाषेतील असाईमुगम हे पद्य सादर करून श्रीकृष्णाची असीम भक्ती व्यक्त केली. सहजसुंदर अभिनयाद्वारे श्रीकृष्णाचे स्वर्गीय सौंदर्य वर्णन आणि राधेची व्यथाही त्यांनी आपल्या देहबोलीतून व्यक्त केली. ग्लेझ दाम्पत्यांच्या गुरू मुथ्थुस्वामींनी शिकवलेली कला त्यांनी 'भजे गोविंदम' या खास फ्रेंच भाषेतील रचनेवर भरतनाट्यम द्वारे सादर केली. उत्तरोत्तर रंगत असलेल्या कार्यक्रमाचा समारोपही नृत्यप्रेमींसाठी अविस्मरणीय ठरला. पार्वती म्हणजे प्रकृती आणि शिव म्हणजे पुरूष. त्यांच्या आनंदनर्तनाने सृष्टीला सौंदर्यसाज चढतो, ती लावण्यरूप धारण करते. ब्रह्माने सृजन केलेली, विष्णुने पालन केलेली सृष्टी पाहुन शिवपार्वती अत्यानंदित होऊन भानविसरत कैलास पर्वतावर कसे नृत्य करतात याचा प्रत्यय देण्यासाठी समारोपाला शिव पार्वतीच्या सवालजबाब 'आनंदतांडवम्' नृत्य सादर केले. कार्यक्रमास भारत फ्रान्स सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष प्रा. दीपक मगरे, महासचिव माधव गाडगीळ आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

नाशिक, प्रतिनिधी

**THE FRENCH ARTISTS PATRICK AND NIRMALA SURPRISED THE RASIKS -** (CONOISSERS OF NASIK)

**The 12th Session of the Indo-French dance festival has been this year enlightened by the couple Patrick and Nirmala Gleyse, and the rasiks was very impressed by the performance of these dancers. In Asai Mugham a bhajan in tamil song, Nirmala was like Mira the great devotee of Krishna. Bhaje Govinda was specially choreographed with French commentary. The programmm was getting higher and higher, it was unforgettable and unthinkable.... Parvati is Prakriti and Shiva is Purush, so ananda performed by the French couple decorated the nature and the nature got beauty from them. Performance Shiva-Parvati conducted the audience to the mount Kaïlasa as if they were Shiva and Parvati dancing on the sacred mountain.**

*LOKSATTA*    *Governmental newspaper*